# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक ०१/१०/२०१८ रोजी (का.प.क्र.१०) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त</u>**

सोमवार दिनांक ०१ ऑक्टोंबर २०१८ रोजी **(दि.२५.०९.२०१८ रोजी पुढे ढकललेली सभा, का.प.क्र.१०)** मा.सभापती, श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह सेथे सकाळी १२.३० वाजता वंदेमातरम् या गिताने सुरु झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त, श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगर सचिव, श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
०२. स.स.श्री.ऋषीकेश चंद्रकांत खैरे
०३. स.स.श्री.सिध्दांत संजय शिरसाट
०४. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
०५. स.स.श्रीमती शेख नरगीस सलीम
०६. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
०७. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे
०८. स.स.श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे
०९. स.स.श्रीमती खान सायराबानो अजमल
१०. स.स.श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी
११. स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान
१२. स.स.श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर
१३. स.स.श्री.अब्दुल नविद अब्दुल रशीद

**<u>विषय क्र. ९३ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.०९ अंतर्गत विविध प्रभागातील अंतर्गत व मुख्य रस्त्यांचे डांबरी पॅचवर्क करणेच्या कामाचे अंदाजपत्रक (State Sehedule Rate Year-2017-2018) सन २०१७-२०१८ नुसार र.रु.४९,९७,७१८/- चे तयार करण्यात आलेले आहे. (Part-I) प्रस्तावीत कामाकरीता अर्थसंकल्प सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पातील रस्ते देखभाल दुरूस्ती या लेखाशिर्ष अंतर्गत तरतुद उपलब्ध आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त असून मा.स्थायी समिती सभेसमोर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करणेबाबत शिफारस आहे.

करीता प्रस्तावीत कामाच्या र.रु.४९,९७,७१८/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.०९ अंतर्गत विविध प्रभागातील अंतर्गत व मुख्य रस्त्यांचे डांबरी पॅचवर्क करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु.४९,९७,७१८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ९४ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने औरंगाबाद येथे स्मृतिवन व स्मारक उभारणेच्या कामाकरीता पी.एम.सी.नियुक्त करणेसाठी ई-महा-निविदा विभागामार्फत जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करून निविदा मागविल्या असता, निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | प्रकल्पाची टक्केवारी शुल्क |
|---|---|---|
| १. | M/s. Roark Cousulting | 3.95 % Project Cost |
| २. | M/s. ARC Associates | 2.70%+GST Extra |
| ३. | M/s. Archohm Consults Pvt.Ltd. | 3.50 101% |

उक्त प्राप्त दरपत्रकांपैकी सर्वात कमी दर हे M/s. ARC Associates यांचे होते. तथापि, त्यांनी दि.२१.०४.२०१८ रोजी पत्र देऊन सदर कामाकरीता पी.एम.सी. म्हणुन काम करण्यास असमर्थता दर्शविली. या पार्श्वभुमीवर त्यांची 1% अनामत रक्कम जप्त करून त्यांची निविदा रद्द करण्यात आली आहे. या कामाकरीता निविदा दाखल केलेले Second Lowest M/s. Archohm Consults Pvt.Ltd. यांनी First Lowest च्या दराने म्हणजेच या दराने 2.7%+GST Extra पी.एम.सी. म्हणुन काम करण्यास सहमती दर्शविली.

तरी शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.४३४/नवि-२० दि.२९.०३.२०१७ नुसार प्राप्त होणा-या अनुदान र.रु.५ कोटी मधून एन-६ सिडको येथे प्रस्तावीत स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने स्मृतिवन व स्मारक उभारण्याच्या कामाअंतर्गत संकल्प चित्रे/आराखडे, अंदाजपत्रके व तद्नुषंगीक पुढील कामे, मान्यतेनंतर निविदा पुर्व व निविदा अंतिम झाल्यानंतर प्रत्यक्ष कामावर प्रकल्प व्यवस्थापन संकल्पानार्थी (पी.एम.सी.) म्हणून प्रकल्प यशस्वीरित्या कार्यान्वीत होईपर्यंत देखरेख करणे इत्यादी करीता M/s. Archohm Consults Pvt.Ltd. यांची प्रकल्प रक्कमेच्या 2.7%+GST Extra as Applicable (साधारणतः2.7+0.49 =3.19%) दराची निविदा मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

श्री.गजानन बारवाल : शासनाने ५ कोटी दिलेले आहे काम लवकरात लवकर सुरु करावे.

मा.सभापती : ताबडतोब काम सुरु करावे. हा विषय मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको एन-६ येथे प्रस्तावीत स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने स्मृतिवन व स्मारक उभारण्याच्या कामाअंतर्गत संकल्प चित्रे/आराखडे, अंदाजपत्रके व तद्नुषंगीक पुढील कामे, करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदा दरपत्रकांपैकी सर्वात कमी दर हे M/s. ARC Associates यांचे होते, ाथापि त्यांनी दि.२१.०४.२०१८ रोजी पत्र देऊन सदर कामाकरीता पी.एम.सी. म्हणुन काम करण्यास असमर्थता दर्शविल्याने या पार्श्वभुमीवर त्यांची 1% अनामत रक्कम जप्त करून त्यांची निविदा रद्द करण्यात आली असल्याने, या कामाकरीता निविदा दाखल केलेले Second Lowest M/s. Archohm Consults Pvt.Ltd. यांनी First Lowest च्या दराने प्रकल्प रक्कमेच्या 2.7%+GST Extra as Applicable (साधारणतः2.7+0.49 =3.19%) दराने काम करण्यास सहमती दर्शविल्याने, Second Lowest M/s. Archohm Consults Pvt.Ltd. यांच्याकडून प्रस्तावित कामे करून घेण्यासह त्यांच्या निविदा दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८१, ठाकरेनगर, न्यायनगर,मायानगर व एसटी कॉलनी येथे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. या कामाचे ठेकेदार श्री.पी.एस.टेंभुर्णीकर यांचेकडून 2.58% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.४६,२०,१७४/- पर्यंत करून घेणे अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भः-टेंडर क्र.2018-AMCA_279964_12

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | अभियंता झोन क्र.०६ |
| २ | कामाचे स्वरुप | कॉंक्रीट रस्ता तयार करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | ४७४२५३१.२२/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | ई महासेल निविदा सूचना दिनांक ३१/०१/२०१८ |

| | | |
|---|---|---|
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | --- |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ०७/०५/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०२ |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | पी.एस.टेंभुर्णीकर | ४६४२९३८.०६ | २.१०% कमी दराने |
| ०२. | मे.अरोही कन्स्ट्रक्शन | ४६४७६८०.५९ | २.००% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | --- |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | मा.स्थायी समिति सभा दि.१३-२०१८ विषय क्र.३१७ |

तरी विषयांकित काम ठेकेदार पी.एस.टेंभुर्णीकर यांचेकडून २.५८% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.४६,२०,१७४/- पर्यंत करुन घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

श्रीमती राखी देसरडा :या प्रस्तावानुसार ठेकेदाराने बिलो मध्ये टेंडर भरलेले आहे. यानुसार मनपाचा पैसा वाचणार आहे. असे असतांना सुध्दा या ठेकेदारांना पेमेंट वेळेवर दिले जात नाही. असे किती ठेकेदार आहे? यादी द्यावी.

श्री.गजानन बारवाल :काम करणे आवश्यक आहे. मंजुर करावे.

श्री.सिध्दांत सिरसाट :डीएसआर रेट चेंज झाले. अनेक प्रस्ताव ५ ते ६ टक्के बिलोने गेले आता नवीन डीएसआर रेट आले. जे बिलो गेलेले आहे. रेट चेंज केले तर ठेकेदारही काम करतील. २-३ टक्के बिलाचे असेल तर काम करतील. परंतु ६-७ टक्के प्रमाणे बिलो मध्ये काम घेतले असेल त्यासाठी करन्ट जे डीएसआर रेट आहे त्याप्रमाणे काम द्यावे.

मा.सभापती :विषय मंजुर,पुढील प्रस्तावासाठी नवीन डीएसआर रेट प्रमाणे कार्यवाही करता येईल.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८१, ठाकरेनगर, न्यायनगर,मायानगर व एसटी कॉलनी येथे कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार श्री.पी.एस.टेंभुर्णीकर यांचेकडून 2.58% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.४६,२०,१७४/- पर्यंत करुन घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ९६ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुंबई हायवे पासून ते कत्तलखान्याकडे जाण-या रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचे ठेकेदार मे.काकाजी बंडूजी पार्थीकर,यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.00% जास्त दराची

निविदा टेंडर र.रु.८०,००,०००/- पर्यंत करून घेणेस टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.
संदर्भः-टेंडर आय.डी.क्र.2018-AMCA_313449_11 सन 2018-19

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता -१ |
| २ | कामाचे स्वरुप | रस्त्याचे मजबुतीकरण व रस्त्याचे डांबरीकरण करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय. ८०,००,०००/-मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.३५७, दिनांक १९.०३.२०१८ |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | ६४,३८,८८३/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | ई -टेंडर विभाग |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.०४.०७.२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ०६.०७.२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०१ |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.काकाजी बंडूजी पार्थीकर | ६४,३८,८८३/- | अं.प.दरापेक्षा ९.००% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | निविदा समिती सभा दि.४/८/२०१८ |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | प्रो.पुअर बजेट अंतर्गत अं.प. २०१७-१८ |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | प्रो.पुअर बजेट अंतर्गत अं.प. २०१७-१८ |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | लेखा विभाग<br>महानगरपालिका औरंगाबाद |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय. |

तरी विषयांकित काम ठेकेदार मे.काकाजी बंडूजी पार्थीकर यांनी ९.००% जास्त दराने निविदा दाखल केली आहे. त्यानुसार ठेकेदार मे.काकाजी बंडूजी पार्थीकर औरंगाबाद यांचेकडून ९.००% जास्त दराने म्हणजेच टेंडर र.रु.७०,१८,३८२/- पर्यंत करुन घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुंबई हायवे पासून ते कत्तलखान्याकडे जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक ठेकेदार मे.काकाजी बंडूजी पार्थीकर, यांचेकडून ९.००% जास्त दराने म्हणजेच टेंडर र.रु.७०,१८,३८२/- पर्यंत काम करुन घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

**दिलीप सुर्यवंशी**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद